# विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या सवलतीबाबत

१) ज्याचे वय १८ वर्षांचे आत आहे, अशा विद्यार्थ्यांनी वडिलांच्या किंवा वडील ह्यात नसल्यास आईच्या नावाने अर्ज करावे व वडिलांच्या मृत्यूपत्राची झेरॉक्स अर्जासोबत जोडावी. विद्यार्थ्यांच्या स्वत:च्या सहीने अर्ज चालणार नाही व अशा अर्जदारास सवलत मिळणार नाही.

२) फी सवलत मंजूर होण्यासाठी प्रत्येक विषयात महिन्याला ७५% हजेरीचे प्रमाण अनिवार्य आहे. ज्या महिन्यात ७५% हजेरी प्रमाण नसेल त्या महिन्यात तो विद्यार्थी सवलतीस पात्र राहणार नाही आणि फी ची रक्कम स्वत: भरावी लागेल.

३) प्रवेश अर्जावर कायदेशीर पालक म्हणून ज्याचे नाव असेल त्यांच्याच नावाने फी माफीच्या सवलतीचा अर्ज करणे आवश्यक आहे.

४) विद्यार्थी जर दुसरे महाविद्यालय बदलून येथे शिक्षण घेत असेल तर अर्जासोबत जुन्या महाविद्यालयातील आर्डर क्रमांक जोडावे. ज्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणक्रमात खंड पडला असेल व जो विद्यार्थी सवलतीस पात्र असेल अशा विद्यार्थ्यांनी खंडित काळाचे प्रतिज्ञापत्र (Affidavit) द्यावे अन्यथा तो विद्यार्थी सवलतीसाठी पात्र ठरणार नाही.

५) प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या मुला–मुलींसाठी उत्पन्नाची अट नाही. त्यांनी PTC/STC योजनेचे फॉर्म सादर करावे.

६) मागासवर्गीय (SC,ST) विद्यार्थ्यांच्या पालकांचे (शिक्षक/कर्मचारी) उत्पन्न रु. २,००,०००/– (दोन लक्ष) च्या आत असल्यास शिष्यवृती (Scholarship) फॉर्म भरावा. उत्पन्न जास्त असल्यास Free Ship चा फॉर्म भरावा.

७) सवलत धारक नवीन विद्यार्थ्यांनी नवीन अर्ज (Fresh Form) व जुन्या विद्यार्थ्यांनी पुढे चालू अर्ज (Continuation Form) भरावयाचे आहे.

८) बी.ए.,बी.कॉम., बी.एस्सी. भाग –१ मधील गुणवत्ताधारक तसेच कमी आर्थिक उत्पन्न असणाऱ्या विद्यार्थ्यांना हिंदुस्थान पेट्रोलियम शिष्यवृत्तीची सोय. या शिष्यवृत्तीकरिता महाविद्यालयीन सूचनेनुसार ऑनलाईन किंवा ऑफलाईन अर्ज सादर करणे अनिवर्य, निवड झालेल्या विद्यार्थ्यांना प्रत्येकी ५ ते ६ हजार रुपये शिष्यवृत्ती.

# विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असलेल्या शासकीय सवलती

**राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना सवलत :** वार्षिक उत्पन्न रु. ८,००,०००/– पेक्षा जास्त नसावे.

**पी.टी.सी./एस.टी.सी. सवलत :** ज्या विद्यार्थ्यांचे वडील शासकीय किंवा निमशासकीय सेवेत प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शिक्षक तथा शिक्षकेत्तर कर्मचारी असतील अशा कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना ही सवलत अनुज्ञेय आहे.

**अपंगासाठी शिष्यवृती :** जे विद्यार्थी शारीरिकदृष्ट्या अपंग आहेत अशा विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती अनुज्ञेय असून त्यासाठी जिल्हा शल्य चिकित्सकाच्या प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

**अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती योजना :** सन २००७–२००८ या शैक्षणिक वर्षापासून अल्पसंख्यांक (मुस्लीम, पारशी, शिख, ख्रिश्चन व बौद्ध) समाजातील विद्यार्थ्यांसाठी मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती सुरू केलेली असून शिष्यवृत्ती अर्ज ऑनलाईन सादर करून खालील कागदपत्रे विद्यार्थ्यांनी देणे आवश्यक आहे.

१) पासपोर्ट आकाराचे दोन फोटो २) रु. १००/– चे स्टॅम्प पेपरवर उत्पन्नाचे प्रमाणपत्र ३) उत्पन्न मर्यादा रु. ६,००,०००/– ४) निवासस्थानाचा पुरावा (ग्रामपंचायतचा दाखला) ५) अल्पसंख्यांक समाजाचे असल्यास प्रतिज्ञापत्र (Affidavit) रु. १००/– चे स्टॅम्पपेपरवर ६) सांक्षाकित केलेली गुणपत्रिका ७) शाळा सोडल्याच्या प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत ८) मागील परीक्षेत ५०% पेक्षा जास्त गुण असणे आवश्यक आहे.

**शिष्यवृत्ती योजना :** भारत सरकारची शिष्यवृत्ती योजना (GOI Scholarship) ही अनुसूचित जाती, जमाती (२ लक्ष रुपयांपर्यंत) तसेच विमूक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास, ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी अनुज्ञेय आहे, मात्र विद्यार्थ्यांच्या वडिलांचे/पालकाचे मागील वर्षाचे वार्षिक उत्पन्न रु. १,००,०००/– (रुपये एक लक्ष) च्या वर नसावे. शिष्यवृत्ती फार्म ऑनलाईन पद्धतीने भरण्यात येतील.

**शिष्यवृत्ती अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे :** १) महाराष्ट्र रहिवासी दाखला (तहसीलदार/S.D.O.) २) शाळा/महाविद्यालय सोडल्याच्या प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत ३) गुणपत्रिका ४) उत्पन्नाचे प्रमाणपत्र (तहसीलदार) ५) जातीचा दाखला ६) खंड प्रमाणपत्र (गॅप सर्टिफिकेट लागू झाले तर) ७) आधार कार्ड ८) आधार कार्ड लिंक ९) आपला बँक खाता NPCI Mapper Update असावा.

**फी माफी योजना** (Free ship) : ओ.बी.सी., एन.टी., एस.बी.सी. प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या पालकाचे/वडिलांचे वार्षिक उत्पन्न १,००,०००/– च्या वर आहे व ६ लक्ष रुपयापर्यंत व अनु.जाती, जमाती करिता उत्पन्नाची अट नाही. त्यांना फी माफी सवलत अनुज्ञेय आहे. Free ship सवलतीसाठी अर्ज ऑनलाईन करून जातीचे प्रमाणपत्र आणि उत्पन्नाचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

वरील सवलतीचे पूर्णपणे भरलेले अर्ज प्रवेश झाल्यापासून १५ दिवसाच्या आत कार्यालयात सादर करावे. मुदतीच्या आत अर्ज कार्यालयात सादर न केल्यास त्याला सर्वस्वी विद्यार्थी जबाबदार राहील. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती/फ्रिशिप मंजूर झाल्यावर महाविद्यालयात ७ दिवसांमध्ये शिक्षण शुल्क व इतर शुल्क परत करावे लागेल, याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी..

**टीप :**

१) आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक विद्यार्थी (ईबीसी) राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना अंतर्गत धारकाकडून प्रवेशाच्या वेळी शिक्षण शुल्काची रक्कम घेण्यात येणार नाही.

२) आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक/ईबीसी/राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना सवलतीकरिता विद्यार्थ्यांनी खालील प्रमाणे कागदपत्रे जोडावीत.

१) अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate)

२) उत्पन्न दाखला (मर्यादा ८ लाख पर्यंत)

३) आधार कार्ड झेरॉक्स प्रत

४) राष्ट्रीयकृत बँकेचे खाते पासबुक झेरॉक्स

५) आधार कार्ड लिंकिंग प्रत (बँक)

६) मागील वर्षाची गुणपत्रिका प्रत

७) आधार कार्ड मोबाईल क्रमांकाशी लिंकिंग

८) विद्यापीठ परीक्षेची पावती (दोन्ही सेमिस्टर)

९) प्रवेशाची पावती प्रत

१०) वर्ग १० व १२ वी गुणपत्रिकेची झेरॉक्स प्रत.

११) बँक खाता NPCI Mapper Update असावा.

३) सदर योजना Offline किंवा Online शासनाच्या परिपत्रकानुसार राहील.